# राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, कोंकण खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम १९ (३) अन्वये झालेले व्दितीय अपिल

## अपिल क्रमांक : के.आर-४४०/२०१९

**अपिलार्थी, श्री.रजनिश भरत वाघ**

मातृछाया चाळ नं.५/४, शैनेश्वर जिमच्या मागे, शनिमंदिर जवळ

पुणा लिंक रोड, काटेमानिवली, कल्याण पूर्व, जि.ठाणे ४२१ ३०६

विरुध्द

जन माहिती अधिकारी तथा प्रबंधक,
जिल्हा व सत्र न्यायालय ठाणे,
कोर्ट नाका, ठाणे (प), ता.जि.ठाणे ४०० ६०१

प्रथम अपीलीय प्राधिकारी तथा जिल्हा न्यायाधीश-१,
जिल्हा व सत्र न्यायालय ठाणे,
कोर्ट नाका, ठाणे (प), ता.जि.ठाणे ४०० ६०१

**द्वितीय अपिल अर्ज सुनावणीचा दिनांक : १६.४.२०२४**

| माहितीचा अर्ज दाखल केल्याचा दिनांक | जन माहिती अधिकारी यांच्या उत्तराचा दिनांक | प्रथम अपिल अर्ज दाखल दिनांक | प्रथम अपिल आदेश दिनांक |
|---|---|---|---|
| २८.११.२०१८ | २६.१२.२०१८<br>१.२.२०१९ | २६.१२.२०१८ | २८.१.२०१९ |

अपिलार्थी यांनी दि. ४.२.२०१९ रोजीच्या अर्जान्वये " पूर्ण माहिती न मिळाल्यामुळे." असे कारण नमूद करुन कलम १९(३) अन्वये व्दितीय अपिल अर्ज दाखल केला आहे. सदर द्वितीय अपिल अर्जात त्यांनी माहिती मिळावी अशी विनंती केली आहे.

सदर द्वितीय अपिलावर आज दिनांक १६.४.२०२४ रोजी सुनावणी घेण्यात आली.

सदर सुनावणीस अपिलार्थी तसेच तत्कालीन व विद्यमान जन माहिती अधिकारी श्री. प्र. ल.कंठे, प्रबंधक,जिल्हा व सत्र न्यायालय ठाणे हे उपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांचेकडे खालीलप्राणे माहिती मागितली आहे.

**" (मार्च २०१८ या कालावधीत ठाणे जिल्हा न्यायालयांच्या भरती प्रक्रीयेमध्ये निवड झालेल्या उमेदवारांची अर्जदारांसह सर्व परिक्षेचे गुण आणि माहिती मिळण्याबाबत. (पद-कनिष्ठ लिपिक) "**

“सन २०१८ मध्ये झालेल्या ठाणे न्यायालयाच्या रिक्त जागेच्या भरतीप्रक्रीयेमध्ये (मराठी व इंग्रजी) टायपिंग प्रक्रीया पूर्ण झाल्यानंतर शेवटच्या निवड प्रक्रीयेत काही उमेदवारांना स्टार मार्क देण्यात आलेले आहेत. त्यांना काही अटींची पूर्तता करण्यास सांगितले. तरी त्यांची टंकलेखन व्यवस्थित नसताना त्यांची निवड झाल्याचे दिसून येते. त्या उमेदवारांना कोणत्या पात्रतेनुसार निवड करण्यात आली याचे माहिती RTI अंतर्गत माहिती मिळणे आवश्यक आहे. व मला मिळालेले टंकलेखन परिक्षेतील गुण माझ्या माहितीसाठी मिळणे आवश्यक आहे.”

तद्नंतर अपिलार्थी यांनी जोडपत्र ब मध्ये "अपूर्ण माहिती मिळाल्यामुळे." असे कारण नमूद करुन प्रथम अपिलीय अधिकारी यांचेकडे कलम १९(१) अन्वये प्रथम अपिल दाखल केले.

उपलब्ध कागदपत्रावरुन असे दिसून येते की, तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी दि.२६.१२.२०१८ रोजीच्या पत्रान्वये अपिलार्थी यांना उपलब्ध माहिती दिली आहे.

अपिलार्थींनी दाखल केलेल्या प्रथम अपिलावर तत्कालीन प्रथम अपिलीय अधिकारी यांनी दि.२८.१.२०१९ रोजी सुनावणी घेऊन, “अपिल फेटाळण्यात येत आहे.” असे आदेश पारित केले आहेत.

या प्रकरणी जन माहिती अधिकारी यांनी सुनावणी दरम्यान असा युक्तिवाद केला की, अपिलार्थी यांना त्यांना स्वत:ला मिळालेल्या मार्कांबाबतची माहिती दि.२६.१२.२०१८ रोजी देण्यात आलेली आहे. इतर उमेदवारांना मिळालेल्या गुणांबाबतची माहिती ही गोपनीय स्वरूपाची आहे त्यामुळे ती देण्यात आलेली नाही. या संदर्भामध्ये त्यांनी (१) मा. उच्च न्यायालय, दिल्ली यांच्या Writ Petition (C) ६५८६/२०१०, ६५९०/२०१०, ६५९२/२०१०, ६५८६/२०१० व ६५९६/२०१०, ६६०१/२०१०, ६६०२/२०१०, ६६०२/२०१० या प्रकरणांमध्ये दि.५.१०.२०१० रोजी दिलेल्या न्यायनिवाडयाची प्रत, (२) मा. सर्वोच्च न्यायालय यांच्या सिव्हिल अपिल नं. ६१५९-६१६२/२०१३ मधील युनियन पब्लिक सर्व्हिस कमिशन विरुध्द अंगेश कुमार आणि इतर, तसेच सिव्हिल अपिल नं. ५९२४/२०१३ मधील जॉईंट डायरेक्टर्स ॲण्ड सेंट्रल पब्लिक इनफॉर्मेशन ऑफिसर आणि इतर विरूध्द टी. आर. राजेश या प्रकरणामध्ये दि.२०.२.२०१८ मध्ये दिलेल्या एकत्रित न्यायनिवाडयाची प्रत, (३) मा. सर्वोच्च न्यायालय यांच्या दि.१३.११.२०१९ रोजीच्या ऑर्डरची प्रत आणि हरियाणा सरकार यांचे दि.५.१.२०२१ रोजीचे परिपत्रक सादर केले.

तसेच युक्तिवादामध्ये त्यांनी मा. मुंबई उच्च न्यायालय माहितीचा अधिकार (सुधारित २००९) नियम १३ क, ग, ड यांचा उल्लेख करून या नियमांनुसार अपिलार्थीस माहिती उपलब्ध करून देता येत नाही असा युक्तिवाद केला.

**मा. मुंबई उच्च न्यायालय माहितीचा अधिकार (सुधारित २००९) नियम १३ (ड) पुढीलप्रमाणे आहे.**

“महाराष्ट्र न्यायिक सेवा व महाराष्ट्र उच्च न्यायिक सेवांसह मुंबई उच्च न्यायालयाने घेतलेल्या कोणत्याही परिक्षेच्या गोपनियतेचा भंग करणारी कोणताही माहिती गोपनियतेच्या प्रश्नावर सक्षम प्राधिकारी निर्णय घेईल व त्याचा निर्णय अंतिम असेल.”

याबाबत संबंधित सक्षम प्राधिका-यांनी असा निर्णय घेतला आहे का? याबाबत जन माहिती अधिकारी यांनी पुढील तारखेस रेकॉर्ड सादर करणे उचित होईल.

अपिलार्थी यांनी असा युक्तिवाद केला की, दि. ७.१२.२०१८ रोजीच्या पत्राद्वारे जिल्हा व सत्र न्यायालय वर्धा यांनी अशा प्रकारची माहिती, माहिती अधिकारांतर्गत पुरविलेली आहे. तसेच जिल्हा व सत्र न्यायालय दमण यांनीसुध्दा दि.१२.११.२०१८ रोजीच्या पत्रान्वये निवड झालेल्या उमेदवारांची मार्कांसह यादी प्रसिध्द केलेली आहे. यावरून उमेदवारांना परिक्षेमध्ये मिळालेले गुण हे गोपनीय असू शकत नाहीत असा युक्तिवाद अपिलार्थी यांनी केला.

उपरोक्त वस्तुस्थिती विचारात घेता जन माहिती अधिकारी यांचेकडून वरीलप्रमाणे खुलासा घेण्यासाठी हे प्रकरण पुढील सुनावणीस ठेवण्यात येत आहे. प्रस्तुत प्रकरणी पुनश्च: सुनावणी घेण्यात येईल. यास्तव आयोग पुढील आदेश देत आहे.

**आदेश**

**प्रस्तुत प्रकरणी पुढील सुनावणी दि.२९.४.२०२४ रोजी दुपारी १२.०० वाजता घेण्यात येईल.**

राज्य माहिती आयोग महाराष्ट्र

**(शेखर चन्ने)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**कोंकण खंडपीठ**

कोंकण भवन,
बेलापूर, नवी मुंबई : ४०० ६१४.
दिनांक : १६ एप्रिल, २०२४